# एकत्रीत निविष्ठा खरेदीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक बचत

## कमी दरात दर्जेदार मालाची उपलब्धता





**अमरावती**. बाजारामधिल महागडे खत, बियाणे खरेदी करुन शेती अधिक खर्चीक करण्यापेक्षा शेतकऱ्यांनी एकत्रीत येवुन थेट कंपनी मधुन वाजवी दरामध्ये निविष्ठा खरेदी करायला हवी. कृषि समृध्दी प्रकल्पाच्या माध्यमातुन शेतक-यांना एकत्रीत निविष्ठा खरेदी करणेकरीता प्रोत्साहीत करण्याचे काम मागिल 2 वर्षापासुन केले जात आहे. या अभिनव उपक्रमामध्ये कास्तकाराची मोठ्या प्रमाणात बचत तर होतेच शिवाय बाजारात होणारी दगदग व पिळवणुकीपासुन सुध्दा त्यांना मुक्तता मिळते.

### सांघीक उपक्रम

एकत्रीत निविष्ठा खरेदी हे एक सांघीक उपक्रम आहे. शेतकऱ्यांनी एकत्र येवुन सल्ला मसलत करुन एकामताने निर्णय घ्यावयाचा असतो. खत, बियाणे, जमीन सुधारक ईत्यादी खरेदी करायचे असल्यास इच्छुक शेतकऱ्यांनी एकत्र बसायचे, कोणाला किती प्रमाणात निविष्ठा हवी आहे, ही माहिती एकत्रीत करावी. त्यानंतर निविष्ठा पुरवणारी कंपनीशी प्रकल्प अथवा अन्य शासकीय यंत्रणेच्या माध्यमातुन थेट संवाद साधावा. बाजारातील दर पडताळणीकरुन आपल्याला परवडणाऱ्या दर कंपनीशी निश्चित करणे. यामध्ये शेतकऱ्यांचे एकमत होणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरुन भविष्यामध्ये या निर्णयाला घेवुन अन्य कोणताही वाद उत्पन्न होवु नए.

### कमी दरात दर्जेदार माल

मोठ्या प्रमाणातील ऑर्डर एकत्रीतपणे मिळत असल्यामुळे कंपनी देखील निविष्ठांचे दर कमी करण्यास सहज तयार होते. यामुळेच शेतकऱ्यांना दरामध्ये आर्थीक सवलत मिळते. थेट कंपनीला मालाचा पुरवठा करावा लागत असल्यामुळे दर्जा सोबत काहीही तडजोड केल्या जात नाही.

### एकत्रीत निविष्ठा खरेदी मध्ये होणारे फायदे

- *15 ते 20 % आर्थिक बचत*
- *दर्जेदार मालाची हमी*
- *घरपोच मालाचा पुरवठा, बाजारामध्ये जायची दगदग वाचते.*
- *कृषि केंद्र संचालका कडुन होणारी आर्थिक पिळवणुकीपासुन मुक्तता*
- *शेतकऱ्यांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते.*
- *व्यवहारामध्ये जोखिम पत्करायचे धाडस निर्माण होते.*

### एकात्मतेची भावना

शेतकऱ्यांनी एकत्रीत येवुन निविष्ठा खरेदी करण्याचा उपक्रम नाविन्यपूर्णच आहे. अश्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते. या भावनेचा लाभ त्यांना इतर उपक्रमामध्ये सुध्दा होतो. शेतकरी एकत्र आल्यामुळे त्यांना व्यवहारामध्ये जोखिम पत्करायचे धाडस निर्माण होते. जवाबदारींचे वाटप, एकमेकांना समजुन घेण्याची भावना ई.बाबी या उपक्रमाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना शिकायला मिळतात.

### फॉस्पोजिप्सम वर 50% अनुदान

भूसुधारक फॉस्पोजीप्समच्या वापराने जमिनीची पत सुधारते व उत्पादन क्षमता वाढते. यामुळे या उपक्रमाला प्रोत्साहीत करणेकरीता प्रकल्पाने 50% अनुदान सुध्दा शेतकऱ्यांना दिले. 2014-15 व 2015-16 मध्ये एकत्रीत निविष्ठा खरेदीच्या माध्यमातुन 19,200 क्विंटल फॉस्पोजीप्सम शेतकऱ्यांनी खरेदी केले आहे.

**शेतकऱ्यांनी एकत्रीत येवुन केलेली निविष्ठा खरेदी**

| | | |
|---|---|---|
| **2014-15** | | |
| मका बीयाणे | 2.46 क्विंटल | महाबीज |
| कापूस बीयाणे | 14.57 क्विंटल | सुरज व CICR.,<br>अजीत सिड्स 155 |
| सिंगल सुपर फॉस्फेट | 5550 क्विंटल | श्रीराम फर्टीलायजर |
| युरीया | 316 क्विंटल | IFFO व RCF |
| S9 कल्चर (बायोडायनामीक व सेंद्रीय) | 40197 पॅकेट | सुपा बायोटेक |
| फॉस्पोजीप्सम (भूसुधारक) | 15470 क्विंटल | आरती फर्टीलायजर |
| तन नाशक (विडीसाईड) | 3270 लिटर | Patriot, percuit, Odisy |
| **2015-16** | | |
| फॉस्पोजीप्सम (भूसुधारक) | 3730 क्विंटल | आरती फर्टीलायजर |
| सिंगल सुपर फॉस्फेट | 2070 क्विंटल | |
| सिंगल सुपर फॉस्फेट (पावडर) | 750 क्विंटल | |

**वेळ, श्रम व पैश्याची बचत**

अचलपुरचे शेतकरी आकाश गिरी यांचेनुसार प्रकल्पाच्या माध्यमातुन गेल्या वर्षी अचलपुर तालुक्यामध्ये एकत्रीत निविष्ठा खरेदी करण्यात आली होती, ज्यामध्ये शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा झाला. एकत्रीत खरेदी केल्यामुळे बाजारात 1300 रुपयाला मिळणारी अजित 155 वाणाची बॅग शेतकऱ्यांना 830 रुपयाला मिळाली. 1500-1600 रु. प्रती पोतं प्रमाणे मिळणारे परस्युड (तन नाशक) 1300 रुपयाला उपलब्ध झाले. या प्रमाणेच 350 रु. प्रती पोतं प्रमाणे मिळणारे एसएसपी (सिंगल सुपर फॉस्पेट) 270 रुपयाला व 350 रुपए प्रती पोतं मिळणारा युरीया 298 रुपयाला शेतकऱ्यांना घरपोच उपलब्ध झाले.



**आकाश गिरी**, असदपुर, अचलपुर., मो.नं. 9527473460